नि दरखास्त **क्र. ०४/२०२५**

//३// **रंजना वि. शिवदास**

**धनको सा.क्र. (नि.क्र.५२ )**

**<u>उलटतपास ऋणको तर्फे. श्री बी डी जाधव वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

४ मी अनंत व रंजना भूरकापल्ले यांना माझ्या लहानपणापासून ओळखतो. हे खरे की, ज्याठिकाणी पाटया लावल्या होत्या तेथून माझे घर पाचशे मिटर अंतरावर आहे. हे खरे नाही की, मी व माझ्या मुलाने व त्याच्या मित्राने तोडल्या आहेत. माझ्या शेताजवळील नाला बुजवला म्हणून केशव रेडडी यांनी माझ्याविरुध्द तहसील कचेरीत तक्रार दिली होती. हे खरे नाही की, त्या तक्रारीच्यावेळी तहसिल कचेरीतील लोक मोजणीकरीता आले होते. हे खरे की, कचेरीतील लोकांनी त्याठिकाणाचा पंचनामा केला होता. हे खरे की, पंच म्हणून मी त्यावर सही केली होती. हे खरे नाही की, नाल्याबददल केशवने तक्रार केली म्हणून मी त्याला जिवानिशी मारण्याची धमकी दिली. गट नं ५२७ व ५२८ मध्ये पाटया लावलेल्या नाहीत, हे खरे नाही. हे खरे की, माझ्या शेतात पाटया लावून त्याचा विडीओ तयार केला होता. हे खरे नाही की, मी आणि केशव यांच्यात नाल्यावरुन वाद असल्याने अनंत भूरकापल्ले यांच्या सांगण्यावरुन मी आजरोजी साक्ष देत आहे. गट क्र ५२७ व ५२८ च्या उत्तरेला माझी जमीन आहे. माझे घर उत्तरेलाच आहे. गट क्र ५२७ व ५२८ मध्ये दिनांक २५/०४/२०२६ रोजी सोनू उर्फ केशव चामे याने लावलेल्या पाटया उपडून टाकल्या असे मी खोट सांगतो, हे खरे नाही. हे खरे नाही की, माझ्यासमोर ही घटना घडली हे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, या घटनेचा खोटा विडीओ तयार केला. अनंत भूरकापल्ले येथे कसे नांगरतो हे मी बघतो असे केशव उर्फ सोनू याने म्हटले, असे मी खोटे सांगतो, हे खरे नाही. हे खरे नाही की, बनावट विडीओ तयार करुन अनंत भूरकापल्ले यांना मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र सादर केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**( उलटतपास पुर्ण.)**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/–

**( एस.एन.सरडे )**

दिनांक ०७/०५/२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदपूर